सं.फौ.ख.क्रं.३१५/२०२२
शासन वि निखील
नि.क्रं. ४१

**सरकारतर्फे साक्षीदार क्रं. ८ यांची शपथेवर जबानी**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | आर. एन. सूर्यवंशी, |
| वय | : | ५० वर्षे |
| व्यवसाय | : | सहा. पोलीस फौजदार, |
| राहणार | : | नेमणूक– कोकरुड पोलीस स्टेशन |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. बी. जाधव यांचेमार्फत**

१. दि. २३/०६/२०२२ रोजी मी कोकरुड पोलीस ठाणे येथे पो.ह. म्हणून नेमणूकीस होते. वरिष्ठांच्या लेखी आदेशाने आकस्मीत मयत रजि. नं. ९/२०२२ प्रमाणे गुन्हाचा तपास माझेकडे आला. मला तपासाकामी मिळालेली लेखी आदेश दाखविला तो तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तपास आदेशास **नि. ४२/पी.डब्ल्यू ८** देणेत येते. मला तपासाकामी मरणोत्तर पंचनामा, मृत्यू प्रमाणपत्र, कराड शहर पोलीस स्टेशनचा आदेश व एमएलसी कागदपत्रे, मयताचे फोटो, कोकरुड पोलीस स्टेशन मयत नोंदीचा उतारा ही कागदपत्रे मिळाली. मयत जयंत जाधव हा अपघातामध्ये मयत झाल्यामुळे गु.र.नं. ११८/२०२२ कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व ३०४–अ प्रमाणे मयताचे आईने फिर्याद दिल्याने गुन्हा नोंदविला.

२. त्यानंतर मी चांदोली ते शेडगेवाडी जाणाऱ्या रोडवर दिपक पाटील यांचे घराजवळ २०० मीटर अंतरावर, रस्त्याच्या साईडपट्टीवर घटनास्थळ पंचनामा केला. पंचनामा पाहिल्यास ओळखू शकते. **नि. २३** वरील पंचनाम्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. घटनास्थळावरील तीन फोटो मी काढले ते तेच आहेत त्यास ओळखीकामी आर्टिकल अ,ब,क देणेत येते. मी केलेल्या तपासाबाबतचे सर्व कागदपत्रे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सुपूर्त केली. पुढील तपास श्री. संजय पाटील, पो.उ.नि. यांनी केला.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. एस. शितापे यांचे मार्फेत उलटतपास**

३. तपासकामी जातेवेळी त्याबाबत स्टेशन डायरीला नोंद केलेबाबत आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचांना लेखी नोटीस दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंच फिर्यादीच्या गावचे आहेत. अमान्य की, पंच फिर्यादीचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर तुटलेल्या काचा अथवा इतर गोष्टी मिळून आल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे

की, फोटोबाबत ६५ब प्रमाणपत्र दिले नाही. अमान्य की, पोलीस स्टेशनला पंचनामा केला. अमान्य की, आरोपीविरुध्द पुरावा नसताना देखील कागदपत्र दाखल केली. अमान्य की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

दि. २३.०६.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.06.23 18:06:21 +0530

श्री.एम.आर.बडाख
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, शिराळा